**महाराष्ट्र शासन**

शिक्षण निरीक्षक कार्यालय, बृहन्मुंबई दक्षिण विभाग
ई-विटा इंप्रेस इमारत, पहिला मजला, जी.डी. आंबेकर मार्ग, परेल, मुंबई ४०००१२

दूरध्वनी क्र.: ०२२-२३००२४३३ /२३००२९३३, ई-मेल : sz_ei@yahoo.co.in संकेतस्थळ :- www.eisouth.com

**जा.क्र.शिनि/दवि/माशि-३/का.वे.वा./२०२३-२४/** 1734 दिनांक : - 2 AUG 2023

**प्रति,**
**मुख्याध्यापक (सर्व),**
**शिक्षण निरीक्षक, दक्षिण विभाग,**
**मुंबई अंतर्गत अनुदानित माध्यमिक शाळा,**

**विषय :- शासन परिपत्रक वित्त विभाग दिनांक २८/०६/२०२३ च्या अनुषंगाने दिनांक १ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन सेवानिवृत्ती वेतन आणि तदनुषंगिक लाभ मिळणेबाबत**

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्र. वेतन-२०२३/प्र.क्र.१३/सेवा-३, दिनांक २८/०६/२०२३

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णयान्वये दिनांक ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या शासकीय कर्मचा-यांना जलगतच्या १ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन सेवानिवृत्ती वेतन निश्चित करण्याबाबत आणि त्यासंदर्भाने निवृत्तीवेतनाची पुनर्गणना, सेवा उपदान, अंशराशीकरण आणि रजा रोखीकरणांसह करुन सदर लाभ अनुज्ञेय करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. तरी याबाबतच्या सूचना सर्व संबंधित सेवानिवृत्त शिक्षक / शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना आपले स्तरावरुन देण्यात याव्यात.

विहित नमुन्यातील अर्ज सोबत जोडला आहे. सदर अर्ज तसेच सेवानिवृत्ती वेतन प्रदान आदेश व बँक पासबुकच्या प्रथम पृष्ठाची झेरॉक्स प्रत पात्र सेवानिवृत्त कर्मचाऱ्याने संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकांकडे तीन प्रतीत सादर करावे. सेवानिवृत्त कर्मचाऱ्याने सादर केलेला अर्ज दोन प्रतीत या कार्यालयास सादर करावा.

(देविदास महाजन)
शिक्षण निरीक्षक,
दक्षिण विभाग, बृहन्मुंबई

श्री/श्रीम. ----------------------------------

पदनाम -------------------------------------

कार्यालय -----------------------------------

---------------------------------------------

दिनांक :-

**प्रति,**

**मुख्याध्यापक**

**----------------------------------------**

**----------------------------------------**

**विषय :- शासन परिपत्रक वित्त विभाग दिनांक २८/०६/२०२३ च्या अनुषंगाने दिनांक १ जुलै -------- रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन सेवानिवृत्ती वेतन आणि तद्नुषंगिक लाभ मिळणेबाबत**

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन वित्त विभाग परिपत्रक क्र. वेतन-२०२३/प्र.क्र.१३/सेवा-३, दिनांक २८/०६/२०२३

मा. महोदय,

मी, श्री / श्रीमती ------------------------------------------------------------ --------------- पदावरुन आपल्या शाळेतून नियत वयोमानानुसार / स्वेच्छानिवृत्ती स्विकारुन दिनांक -------------------- रोजी सेवानिवृत्त झाले / झालो असून त्यानुषंगाने मला सेवानिवृत्तीचे लाभ अनुज्ञेय करण्यात आले आहेत. माझा निवृत्तीवेतन प्रदान आदेश क्र. ---------------------------असून मी माझे निवृत्तीवेतन अधिदान व लेखा कार्यालय, मुंबई / जिल्हा कोषागार कार्यालय ------------------------- यांचेमार्फत ------------- --------------------------------------------- शाखा ------------------------ येथून घेत असून माझा निवृत्तीवेतन खाते क्रमांक आणि बचत खाते क्रमांक खालीलप्रमाणे आपल्या माहितीस्तव सादर करीत आहे. माझे निवृत्तीवेतन आदेश तथा बँक खात्याचे पासबुकांच्या छायांकित प्रती आपल्या माहितीसाठी व सुलभ संदर्भासाठी सोबत जोडत आहे.

निवृत्तीवेतन खाते क्रमांक : ---------------------------------- CIF - -------------------------

बचत खाते क्रमांक : ---------------------------------- CIF - -------------------------

आता उपरोक्त संदर्भांकित दिनांक २८/०६/२०२३ च्या शासन निर्णयानुसार दिनांक ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या शासकीय कर्मचा-यांना जलगतच्या १ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ विचारात घेऊन सेवानिवृत्ती वेतन निश्चित करण्याबाबत आणि त्यासंदर्भाने निवृत्तीवेतनाची पुनर्गणना, सेवा उपदान, अंशराशीकरण आणि रजा रोखीकरणांसह करुन सदर लाभ अनुज्ञेय करण्याबाबत निर्देशित करण्यात आले आहे.

त्यासंदर्भाने दिनांक २८/०६/२०२३ च्या वित्त विभागाच्या परिपत्रकातील निर्देशानुसार मला लाभ मिळावेत ही विनंती.

आपला / आपली

(-------------------------)

पत्ता :- ---------------------------------------

-----------------------------------------------

-----------------------------------------------

भ्रमणध्वनी क्रमांक : ------------------------